**<u>घटक क्र. २:-</u>** **कर्ज संलग्न व्याज अनुदानाच्या माध्यमातून आर्थिक दृष्टया दुर्बल व अल्प उत्पन्न घटकांसाठी परवडणाऱ्या घरांची निर्मिती करणे.**

**(नमुना प्रतिज्ञापत्र)**

## <u>प्रतिज्ञापत्र/हमीपत्र</u>

### <u>विशेष कार्यकारी दंडाधिकारी सोलापूर</u>

| | | |
|---|---|---|
| १. | प्रतिज्ञापत्र लिहून देणार | : ________________________ |
| | वय | : ________________________ |
| | धंदा/ व्यवसाय/ मजुरी | : ________________________ |
| | रा.ता. / जिल्हा | : ________________________ |
| २. | प्रतिज्ञापत्र लिहून घेणार | : सो.म.पा. तर्फे **श्री. श्रीकांत मायकलवार** नोडल ऑफिसर पी.एम.ए.वाय. तथा उपायुक्त, |
| | वय | : **५२** |
| | धंदा/ व्यवसाय/ मजुरी | : **नोकरी** |
| | रा.ता. / जिल्हा | : इंद्रभवन, सोलापूर |

**"सर्वांसाठी घरे" संकल्पनेवर आधारित प्रधानमंत्री आवास योजना घटक क्र. ..................... अंतर्गत लाभ मिळणेकरिता प्रतिज्ञापत्र लिहून देतो/देते की,**

१. मी अथवा माझ्या कुटुंबाच्या नावाने इतर कोणत्याही पर्यायाने किंवा इतर घटकाअंतर्गत अर्ज केलेला नाही व इतर कोणत्याही शासकीय व निमशासकीय आवास योजनेतून अर्ज केलेला नाही व लाभही घेतलेला नाही. तसेच मी दिवाळखोर (Insolvent/Bankrupt) व्यक्ती नाही.

२. मी मागास / इतर प्रवर्गातील आहे. (योग्य ते ठेवावे).

३. मी स्व: प्रमाणित करतो/करते की, माझ्या कुटुंबामध्ये एकूण____सदस्य आहेत. मी व माझ्या कुटुंबातील सर्व सदस्यांचे मिळून एकित्रत वार्षिक उत्पन्न रुपये (अंकात)___________रुपये (अक्षरी) ____________________________________ इतके आहे.

४. माझ्याकडे स्वत:च्या मालकीचे.................................चौ. फुट क्षेत्रफळाची बांधण्या योग्य एन.ए. (NA) भूखंड/प्लॉट आहे आणि या प्लॉटवर मी आर्थिक दृष्टया दुर्बल घटकाकरीता (EWS) ३०० चौ. फुट चटई क्षेत्रापर्यंतचे / अल्प उत्पन्न गटाकरीता (LIG) ६०० चौ. फुट चटई क्षेत्रापर्यंतचे सदनिका मी स्वतः खाजगी/शासनाच्या विकासकाकडून करून घेण्यास तयार आहे. अथवा माझ्याकडे स्वत:च्या मालकीच्या................................चौ. फुट क्षेत्रफळाची भूखंड/प्लॉट आहे आणि या प्लॉटवर मी किमान ३०० चौ. फुट व जास्तीत जास्त ६०० चौ. फुटाचे स्वत: घर बांधणार आहे याची मला पूर्ण माहिती व जाणीव आहे.

५. भारताच्या कोणत्याही भागात माझ्या कुटुंबातील कोणत्याही व्यक्तीच्या नावे पक्के घर नव्हते व नाही. भारताच्या कोणत्याही क्षेत्रात माझ्या कुटुंबातील कोणत्याही सदस्यांचे नावे पक्के घर/सदनिका आहे असे उघडकीस आल्यास शासनाची फसवणूक केल्याबद्दल माझ्या विरुद्ध भा.द.वि. कलम १९९/२००,४२० अन्वये फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येईल व योजनेमध्ये बांधकाम करण्यात आलेले शासनाचे पक्के घर/ सदनिका शासनाकडून ताब्यात घेतले जाईल याची मला पूर्णपणे जाणीव आहे व हे मला मान्य आहे.

६. या योजनेअंतर्गत घरकुलाचा लाभ मिळाल्यानंतर मी घर कोणत्याही व्यक्तीला कमीत कमी १५ वर्ष विकणार नाही व भाड्याने सुद्धा देणार नाही. जर अशा प्रकारे घडल्यास मी या हमीपत्राचा भंग केल्यासारखे होणार आहे व शासनाकडून माझ्यावर केलेली कारवाई मला मान्य राहील.

७. मी सादर केलेली माहिती खोटी आढळल्यास, मी घरकुल योजनेचा लाभ मिळण्याकरिता अपात्र ठरविण्यात येईल याची मला जाणीव आहे व मला मान्य आहे.

८. माझ्या स्वत:चे भूखंडावर घरकुल मंजूर झाल्यावर, बँकेकडून कर्ज प्राप्त झाल्यावर टप्याटप्याने जर घरकुल पूर्ण नाही केल्यास तसे बँकेला कळविले जाईल व व्याज अनुदानाचा लाभ भविष्यात घेता येणार नाही.

९. संपूर्ण कामाचे आर.सी.सी. संकल्पना जसे, सिमेंट, रेती, खडी, स्टील, बिल्डिंग कोड चे नियामवली नुसार मान्यता प्राप्त खाजगी अभियंताच्या मार्गदर्शनाखाली मनपाच्या बांधकाम परवानगीप्रमाणे नकाशातील क्षेत्रफळाप्रमाणे बांधकाम पूर्ण करेन. तसेच सदर घरकुलाच्या कब्जेनंतर पुढील देखभाल व दुरुस्ती मी माझ्या स्वःखर्चाने करून घेईन.

१०. सदरहू घराचे बांधकाम करित असताना सांडपाण्याची व पावसाच्या पाण्याची व्यवस्था मी स्वतः करून घेईन.

११. आर्थिक दृष्टया दुर्बल (EWS) घटकाच्या व अल्प उत्पन्न (LIG) गटाच्या योजनेअंतर्गत घर पूर्ण झाल्यावर योजनेचा नावासहित नामफलक घरकुल/घराच्या दर्शनीय भागात कायमस्वरूपी कराराक्षम वर्षापर्यंत स्व:खर्चाने मी स्वतः लावून घेईन.

१२. मी सदर घरकुल योजनेनुसार कर्ज घेवून बांधल्यास बँकेत संपूर्ण कर्ज फेडण्यास मी स्वतः जबाबदार राहीन.

१३. मला सदर घरकुल आर्थिक दृष्टया दुर्बल घटकातील लाभार्थी म्हणून रु. ३.०० लक्ष पर्यंत आर्थिक मर्यादा असलेल्या उत्पन्नाचा दाखला/अल्प उत्पन्न गटातील (LIG) लाभार्थी म्हणून रु. ३.०० लक्ष ते रु ६.०० लक्ष पर्यंत आर्थिक मर्यादा असलेल्या उत्पन्नाचा दाखला मी स्वत: प्रमाणित/प्रतिज्ञापत्र केलेला आहे. सदर उत्पन्नाचा दाखला खोटा आढळल्यास संपूर्ण अनुदान परत करेन व माझ्या विरुद्ध कायदेशीर कारवाई होईल याची मला जाणीव आहे.

दिनांक:-

नाव व सही:-

ठिकाण:- सोलापूर

**प्रतीज्ञार्थी**

**सत्यापन**

**मी वर नमूद केलेली संपूर्ण माहिती माझ्या माहिती व समजुतीप्रमाणे खरी व बरोबर असून तरी त्याच्या सत्यतेकरीता मी सदर प्रतिज्ञापत्र करीत आहे. ती खोटी आढळल्यास त्यास मी भा.दं.वि. कलम १९९/२०० अन्वये शिक्षेस पात्र राहील. (या प्रतिज्ञापत्राचा मजकूर मला माझ्या मातृभाषेत वाचून दाखविला तो खरा व बरोबर आहे.)**

सही:-

**प्रतीज्ञार्थी**

| | | |
|---|---|---|
| **ओळख:-** | १) पत्नी | : ............................................................ |
| | २) मुलगा/मुलगी | : ............................................................ |
| **साक्षीदार:-** | १) नाव व स्वाक्षरी | : ............................................................ |
| | २) नाव व स्वाक्षरी | : ............................................................ |